




१६ ते ३१ मे २०२५ । किंमत ४५ रु.
एकूण पृष्ठे ५२

पाक्षिक

परिवर्तनाचा वाटसरू

मुस्लिम मराठी साहित्य : समन्वयाच्या दिशेने

२६ व २७ एप्रिल २०२५
नागपूर



फोटोत डावीकडून : डॉ. फारुख शेख (नाशिक), इम्तियाज अली (नागपूर), जावेद पाशा कुरैशी (नागपूर), डॉ. स्वाती कराड (पुणे), हुसैन दलवाई (मुंबई), एस. एन. पठाण (संमेलनाध्यक्ष), ज्येष्ठ विधिज्ञ फिरदोस मिर्ज़ा (नागपूर), प्रभु राजगडकर (नागपूर), डॉ. के. जी. पठाण (सांगली), प्रा. सुरैय्या जहागीरदार (सोलापूर), प्रा. रमेश पिसे (नागपूर)

३८

मुखपृष्ठावरील फोटोत डावीकडून : कर्नल सोफिया कुरेशी, विंग कमांडर व्योमिका सिंग

UPI ID: abhaykanta3@okicici

पाक्षिक परिवर्तनाचा

वाटसरू

वर्ष २५वे / अंक २रा / किं. ४५ रु. / १६ ते ३१ मे २०२५

संपर्क पत्ता
५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११
भ्र. ९७६३२०६२१२ इमेल : pwatsaru@yahoo.com वेबसाईट : www.pvatsaru.com

वर्गणीचे दर : वार्षिक : ८०० रु., त्रैवार्षिक : २,१०० रु., दशवार्षिक : ६,५०० रु., सॉफ्ट कॉपीसाठी वार्षिक ३०० रु., सॉफ्ट + छापील १००० रु. वरील पत्त्यावर ई मनी ऑर्डर, चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी. 'परिवर्तनाचा वाटसरू' या नावाने चेक / डिमांड ड्राफ्ट असावा.

बँक ट्रान्सफरने वर्गणी भरण्यासाठी तपशील
आय.डी.बी.आय. बँक, ठाणे जांभळी नाका शाखा, पुणे । खात्याचे नाव : Pariwartanacha Vatsaru
चालू खाते क्र. : 0495102000023296 । आयएफएससी क्र. : IBKL0000495
Google Pay PhonePe साठीचा मोबाईल नंबर : 8888708963 । युपीआय पेमेंटसाठी वर बारकोड दिला आहे.

'परिवर्तनाचा वाटसरू' हे पाक्षिक मालक-प्रकाशक आणि मुद्रक अभय कांता यांनी नर्मदा ऑफसेट, नारायण पेठ, पुणे ३० येथे छापून ५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ए, कसबा पेठ, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.

*पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी

ISSN: 2250-3145

युजीसी केअर ग्रुप 1मध्ये 'परिवर्तनाचा वाटसरू' पाक्षिकाचा मल्टिडिसिप्लिनरी या कोटीक्रमांतर्गत समावेश केला आहे.

अनुक्रम

परिवर्तनाचा वाटसरू

 प्रकाशन दिनांक : १६ मे २०२५

वृत्तांत

मुस्लिम मराठी साहित्य : समन्वयाच्या दिशेने

(पूर्वार्ध)

कलीम अजीम

१०वे मुस्लिम मराठी साहित्य संमेलन २६-२७ एप्रिल २०२५ रोजी नागपूरात आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाचा वृत्तांत दोन भागांमध्ये देत आहोत.

लेखक पुणेनिवासी असून मुस्लिम समाज-संस्कृतीचे अभ्यासक व चिंतक आहेत.
kalimazim2@gmail.com

दुसरे अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलन १९९२मध्ये शाहीर अज़ीज नदाफ यांच्या अध्यक्षतेखाली नागपूरला आयोजित करण्यात आले होते. त्यानंतर २०२५ साली ३२ वर्षांनी पुन्हा एकदा दीक्षाभूमीत दहाव्या साहित्य संमेलनाचं आयोजन झालं. २६ व २७ एप्रिल असं दोन दिवस चाललेलं हे संमेलन अनेक अर्थाने लक्षवेधी ठरलं. मराठी मुस्लिम समुदायाचं सांस्कृतिक भान हा घटक संमेलनाचा मुख्य केंद्रबिंदू होता. तरीही दलित साहित्य, आंबेडकरी चळवळ व विचारविश्वाची समर्पक चर्चा त्यात अंतर्भूत होती. बंजारा-ख्रिस्ती मराठी साहित्य विचारांची देवघेवही संमलेनात झाली. स्त्रियांची लक्षणीय उपस्थिती संमलेनातील उल्लेखनीय बाब ठरली.

नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू श. नू. पठाण संमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांच्या निवडीवरून वादही झाला. परंतु आयोजकांनी त्याकडे दुर्लक्ष करून संमेलन सुरळित पार पाडण्याची कसब सिद्ध केली. वादाचं कारण संमेलनाध्यक्षांची राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला पूरक वादग्रस्त पार्श्वभूमी तथा त्यांचं हिंदुत्व विचारांचे वाहक असणं होतं. आरएसएसप्रणित हिंदू वर्चस्ववादी राजकारणात वंशसांस्कृतिकदृष्ट्या भारतीय असलेल्या मुसलमानांच्या सततच्या अमानवीकरणाला उत्तर म्हणून 'मुस्लिम मराठी साहित्य चळवळी'ची सुरुवात झाली होती. आता त्याच विरोधी विचारांना चळवळ शरणागत झाली, असा आक्षेप मुस्लिम मराठी लेखक, साहित्यिक, समीक्षक, भाष्यकार, विद्वान व अभ्यासकांनी घेतला. परिणामी अनेक मान्यवरांनी संमेलनाकडे पाठ फिरवली होती. काहींनी साहित्य परिषदेचा तडकाफडकी राजीनामा दिला.

मुंबईच्या अनुपमा उजगरे उद्घाटकाच्या भूमिकेत होत्या. स्वागताध्यक्ष म्हणून शरयू तायवाडे (प्रकृती अस्वस्थतेमुळे त्या संमेलनस्थळी येऊ शकल्या नाहीत.) तर जावेद पाशा कुरैशी मुख्य निमंत्रक होते.

मुख्य सभागृहाला मुस्लिम मराठी साहित्याचे समीक्षक 'मरहूम डॉ. अक्रम पठाण साहित्यनगरी' असं नाव देण्यात आलं होतं. परिसंवाद, भजन, संगीतनाट्य, कथनकथन, एकांकिका, एकपात्री अभिनय, कवी संमेलने, हास्याचे प्रयोग, महिलांची कविता मैफल, बहुभाषिक पद्य इत्यादी भरगच्च अशी वैचारिक व सांस्कृतिक मेजवानी होती.

निमंत्रण पत्रिकेवर उद्धघाटनाच्या मुख्य कार्यक्रमाची वेळ सकाळी १० वाजता होती. त्याप्रमाणे निमंत्रित पाहुणे, साहित्यिक, पत्रकार, मान्यवर इत्यादी वेळेत धनवटे नॅशनल कॉलेजच्या मातोश्री विमलाबाई

देशमुख सभागृहात दाखल झाले. पण मुख्य कार्यक्रम सुरू होण्यास तब्बल २ तास उशीर झाला. दरम्यानच्या अवधीत निमंत्रितांनी उपस्थितांचं कवि संमेलन भरवलं. उद्घाटन सत्र सुरू होईपर्यंत रचना सादर करायची किंवा निवेदन मांडायची मुक्त संधी दिली गेली. त्यामुळे अनेक उत्साही कवि, साहित्यिक व भाष्यकारांनी मंचाचा ताबा बळकावला.

नवेदितांच्या कविता ऐकण्यापेक्षा अनेक जण बाहेर पुस्तकांच्या स्टॉलवर गर्दी करताना दिसले. बाहेर ४३ डिग्री तापमानाने त्रस्त होऊन आत खुर्चीवर विसावलेल्या बहुतेकांकडे अन्य पर्याय नसल्याने ते नवेदित कवींसमोर तिष्ठत राहिले. पण जशी-जशी वेळ पुढे सरकू लागली, तसे सभागारातील खुर्च्या रिकाम्या होऊ लागल्या. उद्घाटन सत्राचे प्रमुख पाहुणे व संमेलनाध्यक्ष येताच उत्साहित कवींना थांबवून त्यांच्याकडून माईक काढला गेला.

मुख्य सत्राला सुरुवात होताच आयोजकांनी काश्मीरमधील पहलेगाम हल्ल्यातील दहशतवादी कृत्याच्या निषेधाचा ठराव मांडला व उपस्थितांनी दोन मिनिट उभे राहून मृतकांना श्रद्धांजली वाहिली. २२ एप्रिल २०२५ रोजी पहेलगाम येथे अंदाधुंद गोळीबार करून दहशतवाद्यांनी २६ पर्यटकांचा जीव घेतला गेला. या अमानवी कृत्याविरोधात देशभर संतापाची लाट होती. मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाच्या मंचावरून घटनेचा निषेध नोंदवून हल्लखोरांना कठोर शिक्षेची मागणी करण्यात आली.

निवेदिका व कवयित्री नेहा गोडघाडे यांनी अल्पशी भूमिका मांडत मुस्लिम मराठी साहित्य चळवळीचा इतिहास व रूपरेखा थोडक्यात कथन केली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते समईवरील दिवे उजळून उद्घाटनाचं सत्र सुरू झालं. त्यानंतर हाजी नासीर यांच्यातर्फे कुरआन पठण झालं. पुढे एक-दोन शर सांगून त्यांनी वातावरण निर्मिती केली.

एक दुसरे के धर्म का सम्मान करेगे,
झगडा न कभी हिंदू-मुसलमान करेगे..
वफादारी वतन से हो, यहीं इस्लाम कहता हैं,
हम अपने दिल में, हर गोशे में हिन्दोस्ताँ रखते हैं.

कुरआन पठणानंतर ममता मून यांनी राज्यघटनेतील उद्देशिकेचं सामूहिक वाचन केलं. कार्यक्रम पुढे नेताना जिया कुरैशी या तरुणीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्यासाठी तयार केलेलं भजन व विद्यापीठ गीत सादर केलं. गीतानंतर संमेलनाध्यक्ष तथा मंचावरील सर्व मान्यवरांच्या जाहीर सत्काराची औपचारिकता पार पडली.

मंचावर अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाचे पहिले अध्यक्ष फ. म. शहाजिंदे, कोमल ठाकरे, अनुपमा उजगरे, सरदार जगजित सिंह, नीतीन सरदार, धनवटे कॉलेजचे प्राचार्य प्रशांत कोठे, आसिफ कुरैशी, अशोक यावले, हुसैन दलवाई, रमेश पिसे, अब्दुल रऊफ शेख, मुबारक शेख, इ.जा. तांबोळी, अय्यूब नल्लामंदू, हसीब नदाफ यांच्यासह सोलापूरच्या साहित्य परिषदेचे अन्य पदाधिकारी होते.

सभागृहात नागपूरचे प्रमोद मुनघाटे, अमिताभ पावडे, लोकनाथ यशवंत, कुलदिप रामटेके, शैल जेमिनी, मोहिब कादरी, फारुख शेख, मिर्जा रफी अहमद बेग यांच्यासह अनेक दिग्गजांची हजेरी होती.

सत्कारानंतर मान्यवर लेखकांच्या पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम पार पडला. सर्वप्रथम मुस्लिम मराठी साहित्य परिषदेची स्मरणिका 'मऱ्हाटवाणी'चं प्रकाशन झालं. या ८० पानी विशेषांकांचे संपादक प्रसिद्ध कवी मुबारक शेख होते. प्रमोद मुनघाटे लिखित 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज' (चरित्र), गौस शिकलगार यांचे 'शब्द सारथी' (कवितासंग्रह), के. जी. पठाण - 'उतावयातील चढण' (काव्यसंग्रह), मुबारक शेख - 'अज़ान आणि चालिसा' (काव्यसंग्रह), नसीम जमादार - 'सावी- एक संघर्षमय जीवनाची गाथा' (लघु कादंबरी), 'कासिद' (संमेलन विशेषांक), मुजफ्फर सय्यद संपादित - 'ईद उल फित्र' (रमज़ान विशेषांक), सलीम शेख संकलित 'संत महात्मे

व विचारवंत' (इंग्रजी आवृत्ती), अनुपमा उजगरे संपादित – 'मराठी व ख्रिस्ती वाङ्मयाचा इतिहास –१८१०–१९२७', जावेद पाशा कुरैशी लिखित 'हिंदुत्व आणि धर्मांतरीत मुस्लिमांपुढील आव्हाने' (वैचारिक) अशा एकूण १० पेक्षा अधिक पुस्तकांचं लोकार्पण पार पडलं.

मुख्य सोहळ्याला सुरुवात होताच आयोजक–आमंत्रक म्हणून जावेद पाशा कुरैशी यांनी एकूण संमेलनविषयक भूमिका मांडली. त्यात त्यांनी साहित्य परिषद निर्मितीचा ऐतिहासिक आढावा घेतला. म्हणाले, आम्हाला आमच्या सोबत जगणाऱ्या, सहजीवनात असणाऱ्या बहुसांस्कृतिक मुस्लिमेतर समुदायाशी संवाद करायचा होता. त्यासाठी जेव्हा आम्ही उभे झालो, त्यावेळी तमाम प्रागतिक व आधुनिक विचारांच्या चळवळी साथ देण्यासाठी आमच्या पाठीशी आल्या. अशा वातावरणात स्व–अभिव्यक्तीसाठी मुस्लिमांनी व्यक्त होणे गरजेचं आहे. या मराठी मातीचा सुगंध हिंदू आणि मुसलमानात विभागलेला नाही, तर राष्ट्रभक्ती व देशभक्तीला वाहिलेला आहे, हे मांडण्यासाठी आम्ही इथं जमलो आहोत.

पुढे कुरैशी म्हणतात, हे संमेलन मुसलमानांचे नाही, पण व्यक्त होण्यासाठी आमच्याकडे पर्याय नाही, कारण मारणारा दाढी–टोपी, चेहरा व पेहराव पाहूनच मारतो आहे. दाढी, चेहरा, पेहराव हे आमच्या अभिव्यक्तीचं साधन नाही, तो आमच्या संस्कृतीचा भाग आहे, अभिव्यक्तीचं साधन म्हणून आज आम्ही तुमच्यासमोर उभे आहोत.

माणूस म्हणून आमच्याकडे बघणार की नाहीत, असा प्रश्न उपस्थित करत ते म्हणतात, मुसलमान नुसता बाबर, औरंगजेबची औलाद नाही, तो अब्दुल हमीद सारखा शूरवीर आहे, तो मिसाइलमॅन अब्दुल कलाम आहे, आम्ही शेतकरी आहोत, न्हावी आहोत, कुणबी, तेली, चांभार आणि मोची सुद्धा आहोत. ...तुम्हाला बुरखेवाली बाई दिसते, पण मोमीनपुऱ्यात जाऊन बघा, आठ–आठ तास लूमवर बसून ती आपल्या लेकरांसाठी सूत कातत असते, ती आई तुम्हाला दिसत नाही? नांगर धरणारी, पेंढ्या बांधणारी स्त्री तुम्हाला दिसत नाही?

स्वागताध्यक्ष शरयू तायवाडेंच्या वतीने कोमल ठाकरे यांनी भाषण केलं. म्हणतात, शब्दांची पूजा करत नाही, मी माणसासाठी आरती गातो, ज्यांच्या गावात सूर्य नाही, त्यांच्या हातात उजेड देतो, असं उजेड देणारं हे संमेलन आहे. पुढच्या मांडणीत म्हणतात, मुस्लिम मराठी वाङ्मय ही अशी एक काव्यसरिता आहे, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक मातीतून शतकानुशतकापासून वाहत आली, प्राचीन काळातील संतापासून ते आजच्या आधुनिक लेखकांपर्यंत वाङ्मयाने मराठी साहित्याला एक अनमोल अयाम दिला आहे. करुणा, प्रेम, अहिंसा, शांतीचा संदेश दिला, हे काव्य, हे साहित्य एक सांस्कृतिक सेतू आहे, त्याने हिंदू–मुस्लिम समाजाला जोडलं आहे. त्यामुळे हे संमेलन केवळ एक कार्यक्रम नाही, तर सांस्कृतिक, सामाजिक क्रांती आहे.

अनुपमा उजगरे यांनी संमेलनाचं उद्घाटन झालं असं घोषित करून म्हटलं, ...मुस्लिम मराठी साहित्यिकांनी आपण कुठे कमी पडतो, हे लक्षात घेऊन म्हणजेच आत्मपरीक्षण करून लेखन केलं पाहिजे. त्यांनी इतर समाजाशी व त्यातील लेखकांशीसुद्धा आपला संवाद ठेवला पाहिजे. मुस्लिम मराठी साहित्यिकांनी ख्रिस्ती मराठी साहित्यिकांत दुवा निर्माण करावा, अशी सूचना मांडत त्या म्हणतात, सर्व धर्माच्या भिंती आपण तोडून टाकल्या पाहिजेत. शेजारचं घर जळत असताना, पेटत असताना आपण शांत असू तर माणूस म्हणून घेण्याची आमची लायकी नाही. वेगवेगळ्या धर्मातील लोकांशी आपला सद्भाव राहायला पाहिजे. सलोखा असेल तर सहकारांची भावना राहील.

इतिहासांच्या सांप्रदायिक वृत्तीवर बोट ठेवत त्या म्हणतात, सांगलीमध्ये १८९० साली एलिजाबेथ वाइल्डर नावाच्या मिशनरीच्या सदस्या होत्या. त्यांना

मुलींसाठी शाळा सुरू करायची होती, पण कोणी जागा द्यायला तयार नव्हतं, अशावेळी एका मुस्लिम कुटुंबाने जागा दिली. पण त्या कुटुबांचं नाव आज कोणालाही माहिती नाही. कारण आम्ही इतिहास अर्धवट लिहितो. ज्या चांगल्या गोष्टी आहेत, त्याची नोंद आपण ठेवली पाहिजे.

उजगरे यांनी समन्वयाची गरज व्यक्त करत पुढे म्हटलं, गांधीजींच्या अहिंसा व साने गुरुजींच्या जगाला प्रेम अर्पावे या विचारांची आजही गरज आहे. या गोष्टी कालबाह्य झालेल्या नाहीत. या बाबी जर आपण अंगिकारल्या तर आपल्या सांस्कृतिक पर्यावरणामध्ये कोणी कितीही विषारी वायुचे फुत्कार सोडले तर ते प्रभावहीन ठरतील.

रेव्हरंड नितीन सरदार मुस्लिम मराठी साहित्यातील समन्वयाची भूमिका अधोरेखित करत म्हणतात, कोरोना काळात जीवाची पर्वा न करता मुस्लिम समुदायाने रस्त्यालगत अन्नछत्रे सुरू केली होती. रेल्वे स्टेशनवर अन्नदान केलं. तेच प्रयागराजच्या कुंभ मेळ्यात केलं. चेंगराचेंगरी झाली तेव्हा मुस्लिम लोकांनी हिंदू भाविकांसाठी आपली घरे खुली केली, त्यांना जेवू घातलं, आंघोळीसाठी पाणी दिलं. स्वच्छतागृहे खुली केली. परमेश्वरी प्रार्थनेतून त्यांना या कार्याची प्रेरणा मिळाली. या प्रेरणेतूनच समाज बांधणीचं साहित्य निर्माण झालं पाहिजे. हे साहित्य माणूस जोडणारे आहे, अश्रू पुसणारे आहे, असं दुखा:शी समरस होणारे आणि व्यक्तिमत्व निर्माण करणारे साहित्य जर आपण यशस्वीपणे निर्माण करू शकलो तर विध्वंस करणारे, धर्म आणि जातीत भांडणं लावणारे अल्पसंख्य होतील आणि आपण बहुसंख्य होऊ. यातून प्रेमाचं राज्य आपण आणू शकू.

सरदार जगजित सिंह यांनी हिंदीमधून भाषण करताना म्हटलं, मला मराठीतून बोलता येते पण भाषण करता येत नाही. सहजीवनाच्या परंपरेची गरज व्यक्त करत म्हणतात, ..असे साहित्य संमेलन नेहमी होत राहिले पाहिजे, केवळ हॉलमध्ये नाही तर मोहल्ले, गल्लीतही असे सोहळे व्हावेत. या माध्यमातून आम्हाला लोकांमध्ये जाता येऊ शकेल. त्यातून भारतीयत्वाला वाचवता येईल.

वर्तमान राजकीय स्थितीवर भाष्य करताना सिंह म्हणतात, हा देश सेक्युलर होता आणि पुढेही राहील. ७५० वर्षे मुघल तर २५० वर्षे देशात ब्रिटिशांची सत्ता होती. या काळात देशाने ना इस्लाम स्वीकारला, ना ख्रिस्ती धर्म स्वीकारला. हा देश त्यावेळीही भारत होता आणि आजही भारत आहे.

भारतीयांच्या सहजीवनाच्या वृत्तीवर प्रकाश टाकत ते पुढे म्हणतात, १० वर्षांपासून सत्तेत आलेले लोक केवळ द्वेष व तिरस्कार परसवत आहेत, एका समाजाला दुसऱ्या समाजाशी झुंजवत आहेत. त्याचं सर्व राजकारण हिंदू-मुस्लिमांवर केंद्रित आहे. अंधभक्त व त्यांचे समर्थक या कृतीला विखारी वातावरणात बदलवत आहेत. अशा साहित्य संमेलनात सर्व धर्माचे लोक एकत्र बसून विचार करतात, अशा मंचावरून त्यांना उत्तर जाते की तुम्ही कितीही घृणा पसरवा, द्वेष पसरवा, हे भारताचे लोक आहेत, हे एकत्र राहतील व एकत्रितपणे पुढे जातील.

राज्यसेवेतील माजी उपायुक्त व वक्फ मंडळाचे सीइओ राहिलेले अब्दुल रऊफ शेख यांनी मुस्लिमांनी मराठीशी दोस्ती करावी असा सल्ला दिला. म्हणाले, मुस्लिम लोकसंख्येत १४ टक्के आहे, परंतु नोकरीत केवळ ३ टक्के आहेत. महाराष्ट्रात तर अतिशय दारुण परिस्थिती आहे. राज्य सरकार किंवा अंतर्गत संस्थाच्या नोकरीत मुस्लिमांची संख्या १ टक्क्याहून कमी आहे. १०० लोक राज्यसेवेत निवडली जातात त्यात मुस्लिम एखाद-दुसरा असतो. याचं मोठे कारण म्हणजे मुस्लिमांनी मराठीशी दुरावा निर्माण केला आहे. राज्यसेवा परिक्षेत मराठीमध्ये पेपर असतो, तो मराठीतच लिहायचा असतो. त्यात मुस्लिम मागे राहतो. त्यामुळे शासकीय सेवेमध्ये कुठलेही प्रतिनिधित्व त्यास मिळत नाही.

पुढे त्यांनी भाजप-मोदींच्या सत्ताकाळातील मुस्लिमांशी होत असलेल्या दुर्व्यवहारावर भाष्य केलं. मुस्लिम मराठी साहित्याने वेळोवेळी अन्यायावर आवाज उठवला आहे. सरकारने केलेले सर्व कायदे अन्यायपूर्ण व मुस्लिमविरोधी आहेत. वर्तमान स्थितीत हा आवाज आणखीन बुलंद करायला हवा.

वक्फ विधेयक संदर्भात त्यांनी भाजप सरकारच्या हेतूवर संशय व्यक्त केला. सरकार एकीकडे म्हणतं की आम्ही मुसलमानांचं भलं करतो, तर दुसरीकडे म्हणते, आम्ही हिंदूंचं भलं करीत आहोत; असा खोटा प्रचार सध्या चालू आहे. हा अप्रचार साहित्याच्या माध्यमातून दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

रऊफ शेख संघ-भाजपच्या धोरणांवर टीका करीत असताना संमेलनाध्यक्ष महोदयांनी मध्येच त्यांना भाषण रोखायला लावलं. त्यांचं म्हणणं होतं की राजकीय भाषणे नको. किंबहुना यापूर्वीच्या दोन-तीन वक्त्यांनी राजकीय भाषणे केली त्यावेळी त्यांनी निमूट ऐकलं. परंतु आता मात्र त्यांना संघ-मोदींवर टीका का असह्य झाली? असा प्रश्न अनेक उपस्थितांना पडला. यावरून वादही झाला. सभागृहातून अनेकांनी विरोध करीत म्हटलं, त्यांना राजकीय बोलू द्या, त्यांना थांबवण्याचा तुम्हाला अधिकार नाही.

अशा प्रकारच्या अन्यायावर मुस्लिम मराठी साहित्यिकांनी बोलत राहिलं पाहिजे, अशी सूचना देत रउफ शेख यांनी आपलं भाषण मुहंमद इकबाल यांचा पुढील शेर सांगून संपवलं,

वतन की फ़िक्र कर नादाँ! मुसीबत आने वाली है
तेरी बर्बादियों के मश्वरें हैं आसमानों में..
न समझोगे तो मिट जाओगे ऐ हिन्दोस्ताँ वालो
तुम्हारी दास्ताँ तक भी न होगी दास्तानों में

यानंतर सामाजिक कार्यात उल्लेखनीय योगदान दिलेल्या विदर्भातील मुस्लिम, आदिवासी व आंबेडकरवादी कार्यकर्ते-मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. त्यात हाजी नासीर मुहंमद (उमरेड), जैबुन्निसा शेख, शाहिद अली जाफरी (ताजाबाद), शैल जेमिनी (नागपूर), मोहिब कादरी (अहमदपूर), शकील पटेल, यामिनी चौधरी, विनोद राऊत, जमील अन्सारी (कामठी), जहीरुद्दीन छोटू शेख (वरोरा), नेहा गोडघाटे (नागपूर), नासीर जुम्मन शेख (वरोरा), अब्दुल रहीम 'बंदी' (चंद्रपूर), रुबिना पटेल (ताजाबाद), जलील पटेल (परभणी) इत्यादी होते.

सत्राच्या शेवटी संमेलनाध्यक्ष श. नू. पठाण यांचं बीजभाषण झालं. भाषण सुरू करताना सर्वप्रथम अब्दुल रऊफ यांचं भाषण मध्येच थांबविल्याप्रकरणी त्यांनी वारंवार माफी मागितली. म्हटलं, मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाचा राजकीय अजेंडा नाही, सर्व विचारांना सामावलेलं हे संमेलन आहे, पण चुकीचा संदेश जाऊ नये म्हणून मी हस्तक्षेप केला.

जगजित सिंह या एका वक्त्याने हिंदीत भाषण केल्यामुळे पठाण यांनी त्यांना टोमणा मारला. मराठीच्या संमेलनात मराठीत बोललं पाहिजे, असा आग्रह त्यांनी धरला. मराठीत न बोलता साहित्य संमेलनात भाग घेणे मला मान्य नाही, असं त्यांनी म्हटलं. लागलीच सभागृहात आसनस्थ आजुबाजूच्या अनेकांनी अखिल भारतीय मराठी संमेलनाच्या मंचावरील गुलजार व जावेद अख्तर यांची उपस्थिती व त्यांच्या टाळ्या मिळवणाऱ्या हिंदी भाषणांची आठवण अध्यक्षांना करून दिली.

अध्यक्षीय भाषणात पठाण यांनी नागपूर विद्यापीठाचा कुलगुरू असताना विद्यापीठ गीत म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या एका अभंगाला मान्यता दिल्याचं आवार्जून सांगितलं. त्याचा रंजक प्रवास (भाषणात लिखित स्वरूपात आहेच) त्यांनी कथन केला. कुलगुरू म्हणून केलेली पहिली स्वाक्षरी विद्यापीठ गीताच्या मान्यतेची होती, ही बाब त्यांनी उपस्थितांच्या लक्षात आणून दिली. या संमेलनामधून हिंदू-मुस्लिम एकोप्याचा संदेश जायला हवा, हाच या संमेलनाचा मुख्य उद्देश आहे. असा विचार मांडत त्यांनी आटोपतं

घेतलं.

उद्घाटन सत्र संपायला उशीर होत असल्याने इतर मान्यवरांना आपली भाषणं करण्याची संधी मिळू शकली नाही. त्यांना समारोपाच्या सत्रात आपलं मत मांडण्याची संधी मिळेल अशी, ग्वाही देऊन आयोजकांनी उद्घाटन सत्राचा समोराप केला. पहिल्या सत्राचं आभार इ.जा. तांबोळी यांनी मानले.

सत्र दुसरे

'मध्ययुगीन मुस्लिम मराठी संताचे समतावादी साहित्य आणि संत चळवळीचा अन्वयार्थ' हा संमेलनातील पहिला परिसंवाद होता. दुपारी चारच्या सुमारास त्याची सुरुवात झाली. या विषयावरील मांडणीसाठी इ. जा. तांबोळी, सुरैय्या जहागीरदार, उपेंद्र महाले, ज्ञानेश्वर रक्षक यांना आमंत्रित करण्यात आलं होतं.

सोलापूरच्या सोशल महाविद्यालयाचे प्राचार्य तांबोळी यांनी आपल्या विवेचनात मध्ययुगीन मुस्लिम मराठी साहित्य परंपरेचा आढावा घेतला. बाराव्या शतकातील मुंतोजी ब्राह्मणी, हुसैन अंबरी, शाह हुसैन फकीर, चांदसाहेब कादरी, शेख महंमद, जंगली फकीर, शाह मुनी इत्यादी संताच्या मराठी भाषेतील योगदानाविषयी माहिती दिली. म्हणतात, नागेश संप्रदायात अनेक मुस्लिम संत झाले. त्यांनी द्राक्षांची बाग लावली नाही, केळीची बाग लावली नाही किंवा १०० एकर ऊस लावला नाही, तर त्यांनी माणसं पेरण्याचं व माणसं उगवण्याचं व माणसं घडविण्याचं व माणुसकी जिवंत ठेवण्याचं कार्य केलं.

तत्कालीन समाजव्यवस्थेवर भाष्य करताना तांबोळी म्हणतात, ज्या माणसाला घरामध्ये घ्यायची परवानगी नव्हती, ज्या माणसाला सार्वजनिक स्थळी पाणी भरायची परवानगी नव्हती, ज्या माणसाला स्पर्श केल्याने विटाळ व्हायचा, ज्या माणसाची पावले रस्त्यावर उमटू नयेत म्हणून पायाला झाडू बांधला जाई अशा अन्यायकारक परिस्थितीत संतांनी माणुसकी जपण्याचं, मानवाला जवळ घेण्याचं व त्यांची सेवा करण्याचं कार्य केलं.

वर्तमान स्थितीत संतपरंपरेच्या नावाने सुरू असलेल्या भोंदुगिरीवर प्रहार करीत तांबोळी म्हणतात, आज मुस्लिम समाजातील काही वली म्हटले जाणारे लोक आहेत. त्यांच्याकडे आमदार गेल्यावर त्यांना आत घेतलं जातं. पैशांची बंडलं पाहून त्यांच्या डोक्यावर हात ठेवला जातो. मात्र सर्वसामान्य माणसाला हात ठेवायचं नाही, असे हे लोक आहेत. अशा प्रवृत्तीवर मध्ययुगीन संतानी कठोर प्रहार केलेला आहे.

दुसरे वक्ते, उपेंद्र महाले यांनी सुफी-संताच्या थोर कार्याची उजळणी केली. म्हटलं, संतानी जगण्याची आचार संहिता सांगितली. आर्थिक उन्नती व आत्मिक बळ वाढविण्याकरिता एक अभ्यासक्रम दिला. त्याला आम्ही धर्म म्हटलं. त्यांनी दिलेली शिकवण कोणा एका जात, धर्म समुदायासाठी नव्हे तर सर्वांसाठी होती. इतके धर्म, इतके उपपंथ तरीही इतका हिंसाचार? इतके डॉक्टर, इतक्या औषधी तरीही एवढ्या बिमाऱ्या? कुठे तरी चुकत आहे, काहीतरी बदल व्हावा.

इतरांच्या धर्मावर चिखलफेक करणाऱ्या प्रवृत्तीना उद्देशून ते म्हणतात, धार्मिक कर्मठता वेगळी व धार्मिक अंधपणा वेगळा. मी माझा धर्म काटेकोरपणे पाळू शकतो. इतरांच्या धर्मात सगळे वाईट आहे, असं म्हणणं धार्मिक मुर्खपणा आहे. राष्ट्रसंताच्या कार्याची महती सांगत पुढे ते म्हणतात, आपल्याकडे शहा मुंतोजीचं साहित्य आहे, शेख महंमदांचं साहित्य आहे, अनगडशाह बाबांची परंपरा आहे, परंतु राष्ट्रसंताच्या दोन ओळीत ते सर्व बसतात. त्या ओळी आहेत,

सर्वासि समत्वाकडे न्यावे। एकत्व व्यवहारी नांदवावे।
अवघे विश्वचि ब्रह्मसुखी डोलावे। वाटे तया संता।।

सुरैय्या जहागीरदार सुफी-संताच्या सेवाकार्याचं स्मरण करताना म्हणतात, पंधराव्या शतकात सुफी-संतानी मानवी मूल्यांची शिकवण समाजाला दिली. एकविसाव्या शतकात त्या नीतीमूल्यांचा ऱ्हास होत

चाललेला आहे, त्यामुळे संतांच्या न्याय, समता व बंधुतेची शिकवण व त्या नीतीमूल्यांची आपल्या समाजाला गरज आहे. मध्ययुगातील मुस्लिम संताचे विचार आणि त्यांच्या चळवळीचा अन्वयार्थ आज एकविसाव्या शतकातही लागू पडतो.

दरम्यान विधान परिषदेचे सदस्य अभिजित वंजारी सभागृहात उपस्थित झाल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर त्यांनी मनोगत व्यक्त करण्यास पाचारण करण्यात आलं. त्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या कार्याचा आढावा घेताना त्यांचे अभंग म्हटले. राज्यघटनेच्या टीकाकारांचा समाचार घेताना त्यांनी म्हटलं, देशातील संत-महात्म्यांचा कल्याणकारी विचार भारतीय राज्यघटनेत अंतर्भूत आहे. राष्ट्रसंतानी जो विचार केला, तोच तर विचार बाबासाहेबांनी केला होता. ज्ञानेश्वराच्या अभंगाचे महात्म्य सांगत मानवी सेवेचे व्रत घेण्याची विनंती त्यांनी केली. तथा दरवर्षी अशा प्रकारचे संमेलने व्हावीत, अशी सदिच्छाही व्यक्त केली.

अध्यक्षीय समारोप करताना ज्ञानेश्वर रक्षक यांनी भारतातील बहुसांस्कृतिक परंपरेचा आढावा घेतला. मोझरी गावी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मस्जिदीसाठी पैसा उभा करून दिला, याविषयी मार्मिक आठवण सांगितली. शिवाय उपस्थितांना तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेचा विचार समजावून सांगितला. या सत्राचे संचालन जमील अन्सारी यांनी केले तर आभार रजनी संबोधी यांनी मानले.

पाचच्या सुमारास दुसरा परिसंवाद 'मुस्लिम मराठी साहित्यातील विद्रोह व वेदना' सुरू झाला. निमंत्रित वक्त्यांपैकी फारुख शेख (नाशिक) व प्रकाश राठोड (नागपूर) हे दोघेच हजर असल्याने हा परिसंवाद लवकर आटोपला. अखिल भारतीय बंजारा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रकाश राठोड यांनी भटक्या विमुक्ताच्या साहित्यातील वेदना व व्यथा आणि मुस्लिम मराठी साहित्यातील व्यथेतील सारखेपणा नजरेसमोर आणून दिला. सामाजिक जाणिवांच्या साहित्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केलं.

अध्यक्षीय समारोप करताना फारुख शेख यांनी वर्तमान राजकारण व त्यातील मुस्लिम द्वेषाच्या विखारी मोहिमेवर प्रहार केला. मॉब लिंचिंगपासून ते आर्थिक बहिष्कार, द्वेश गुन्हे, लक्ष्यकेंद्री हल्ले इत्यादींची मीमांसा त्यांनी केली. समकालातील दाहक व ज्वलंत घटनांवर साहित्य निर्माण करण्याची इच्छा त्यांनी साहित्यिकांकडे व्यक्त केली. या सत्राचं संचलन नसीम जमादार यांनी केलं.

'मुस्लिम मराठी साहित्य प्रवाहाची फुले, शाहू, आंबेडकरी साहित्य प्रवाहाशी बांधिलकी' हा तिसरा परिसंवाद होता. प्रसिद्ध साहित्यिक फ.म. शाहजिंदे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या सत्रात सर्जनदित्य मनोहर, मुजफ्फर सय्यद, मनोहर नाईक, रमेश पिसे इत्यादी वक्ते होते.

परिसंवादाला सुरुवात करत सर्जनदित्य मनोहर यांनी वर्तमान सत्ताधाऱ्यांच्या विद्वेषपूर्ण धोरणावर टीका करत म्हटलं, मुस्लिम मराठी साहित्य चळवळीने ब्राह्मणी परंपरा नाकारली व नवता स्वीकारली. या साहित्याने आधुनिकता स्वीकारली, देशाची संविधान संस्कृती स्वीकारली. समता, बंधुभाव स्वीकारला. या साहित्याने आपली नाळ फुले-आंबेडकरी विचारांशी जोडली. हे विचार त्यांनी आपल्या साहित्यात आणले. १९६०नंतरच्या सर्वच साहित्य प्रवाहांची निष्ठा हा आंबेडकरवाद आहे. मुस्लिम मराठी साहित्य प्रवाहही त्यात आहे. समकाळात जे प्रश्न निर्माण झाले, त्यांना कवेत घेणारे हे संमेलन आहे.

भाजपचे माजी खासदार रामदास तडस यांना जानवे व सोवळे नसल्याने वर्ध्याच्या राम मंदिरात प्रवेश नाकारला गेला. त्यावर भाष्य करताना सर्जनदित्य म्हणतात, साप कधीच आपलं बीळ तयार करत नाही, तो उंदराच्या बीळात जातो. उंदरांना फस्त करतो, मंदिरांचे पुजारी असेच असतात. त्यामुळे आपण त्या मंदिरात जाऊ नये. त्यांनी आपल्याला नाकारण्याआधी आपणच त्यांना

नकार दिला पाहिजे. जेव्हा असा नकार देऊ तेव्हा खऱ्या अर्थाने आपण विद्रोह करून उठू.

चिपळूणचे मुजफ्फर सय्यद यांनी आपल्या भाषणात तिरस्कार, द्वेष पोसणाऱ्या व विकृत साहित्य व लेखनाचा समाचार घेतला. त्यांनी म्हटलं, मुस्लिम समाजाला चारही बाजूने घेराव घालण्यात आलेला आहे. सामाजिक बंदी, आर्थिक बहिष्कार प्रत्येक बाबतीत बंदिस्त वातावरण आहे. जिहाद शब्दाला नकारात्मक अर्थ देण्यात आलेला आहे. अशा स्थितीत मुस्लिम मराठी साहित्यिक अत्यंत संयमाने व पोटतिडकीने मांडणी करीत आहे. हे करीत असताना त्यात आक्रमकपणा आहे, पण भावना दुखावेल, धर्म-जातीला दुखावेल असं कुठलेही साहित्य तो निर्माण करत नाही. शिव-शाहू-फुले व आंबेडकरांच्या विचारांशी आमची बांधिलकी आहे. तेच आदर्श आमच्यापुढे आहेत.

इतिहासाच्या विकृतीकरण करणाऱ्या प्रवृत्तीवर भाष्य करत त्यांनी शिवराय व संभाजी महाराजांचे किळसवाणं चित्रण केलेल्या लिखाणावर बोट ठेवलं. मुस्लिम साहित्यिकांनी असा एकही शब्द लिहिला आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. फातिमा शेख यांची जयंती साजरी केली किंवा त्यांचं कर्तृत्व पुढे आणल्यामुळे सावित्रीमाईंचं योगदान झाकलं जाईल, अशा प्रकारचा दुष्प्रचार सुरू असल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली.

मनोहर नाईक यांनी आपल्या मांडणीत विद्यमान भाजप सरकारच्या ब्राह्मणी धोरणांवर टीका केली. म्हणतात, साहित्यातून संस्कृती निर्माण होते, म्हणून साहित्याला संस्कृती निर्माणाचा प्रकल्प असं म्हणतो. आपल्यावर आता ज्यांची सत्ता आहे, ती साहित्याच्या माध्यमातून स्थापन झालेली आहे. त्यांनी वेद, श्रुती, स्मृती, पुराणं लिहून ठेवली ती आपल्या डोक्यात भरवली आहे, त्या माध्यमातून त्यांनी आज सत्ता स्थापन केलेली आहे.

हिंदुत्व विचारावर आधारित अनियंत्रित सत्ता उलथवून टाकायची असेल तर साहित्य निर्मिती फार महत्त्वाची आहे, असं त्यांनी म्हटलं. हाच विचार ज्योतिबा फुलेंनी सांगितला होता. केवळ विचार नाही तर त्यांनी साहित्य निर्मितीदेखील केली. त्यांच्या साहित्यात स्वतंत्र प्रवाहाची बीजे आहेत. पुढे शाहू महाराजांनी त्यांच्या विचारांना आपल्या राज्यकारभाराची जोड दिली.

राज्यघटना निर्मितीनंतरच अस्तित्त्ववादी, जनवादी, ग्रामीण व स्त्रीवादी साहित्य जन्मास आले असा विचार त्यांनी मांडला. या साहित्य प्रवाहाने संपूर्ण भारताला नवी दिशा दिली, अशी मांडणी करत ते म्हणतात, १९६०नंतर आंबेडकरांची प्रेरणा घेऊन संविधानोत्तर साहित्य निर्माण झालं. स्वातंत्र्योत्तर भारतातील सर्वच प्रागतिक चळवळी, आंदोलने, साहित्य प्रवाह उभे झाले त्यात आंबेडकरवादाची मुळे होती. तिथून आपली वाटचाल योग्य दिशेने होऊ लागली. या साहित्य प्रवाहाने क्रांतीचं वातावरण तयार केलं. या प्रवाहाने मुस्लिम मराठी साहित्य, ख्रिस्ती मराठी साहित्य चळवळी निर्माण केल्या. साहित्य लोकाभिमुख असावं व त्यातून संविधानिक मूल्य प्रसृत झाली पाहिजे, असंही त्यांनी म्हटलं.

रमेश पिसे यांनी आपल्या भाषणात भाजपच्या सत्ताकाळातील राजकीय आणि सामाजिक विभागणीवर टीका केली. काश्मीरच्या पहेलगामचे हल्लेखोर व त्याचा दुष्प्रचार करणाऱ्या हिंदुत्ववादी गटांचा त्यांनी समाचार घेतला. काश्मिरी मुस्लिमांच्या औदार्याचं कौतुकही केलं. काश्मिरी लोकांच्या भारतीयत्वाला स्वीकारणार का नाही? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. दुसऱ्यांच्या धर्मावर बोलताना अतिरेक करू नये असं म्हणत त्यांनी राज्यघटनेच्या मूल्यांचा दाखला दिला. म्हणतात, भारतीय संविधानात सर्वधर्मसमभाव हा कळीचा मुद्दा आहे. आपल्या धर्म-जातीच्या अभिमानाचा गौरव करताना दुसऱ्याची नालस्ती करणं दुसऱ्याला कमी लेखणं हे मंजूर नाही.

ज्येष्ठ साहित्यिक फ. म. शहाजिंदे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महाराष्ट्रातील स्वातंत्र्यपूर्व काळातील

प्रस्थापित पुढारी व त्यांच्या लेखनाचा समाचार घेतला. भाषणाच्या सुरुवातीला त्यांनी देशातील ज्वलंत प्रश्न-समस्यावर चिंता व्यक्त केली. म्हणतात, माझा जन्म झाल्यापासून देशात स्त्रिया, शेतकरी व मुस्लिमांचे प्रश्न आहेत. मी म्हातारा झालो, तरीही ते प्रश्न तसेच आहेत. या सगळ्या प्रश्नांची उत्तरे व्यवस्थेत आहेत. त्यामुळे व्यवस्था बदलल्याशिवाय त्याची उत्तरे सापडणार नाहीत. संविधानाच्या मूल्यांच्या आधारे व्यवस्था परिवर्तनाचा लढा दिला पाहिजे. असं असताना आपण माणसांच्या नावाने भांडत बसलो आहोत. अशा स्थितीत व्यवस्था बदलणे शक्य होईल का?

पुढे ते म्हणतात, ही व्यवस्था समजून घेण्यासाठी महात्मा फुलेंनी केलेली समाज विभागणी समजून घेतली पाहिजे. टिळकांनी केलेल्या समाज विभागणीनुसार आपण विचार करतो. त्यांनी धर्माच्या आधारे ही विभागणी केली होती. त्यानुसार हिंदू धर्मीय सोडून सर्व परके आहेत. परंतु फुलेंनी मानववंशशास्त्राच्या आधारे ही विभागणी केली. त्यानुसार मुसलमानच नव्हे तर सर्वच जनजाती भारतीय ठरतात. टिळकांची मांडणी धार्मिक राष्ट्रवादावर आधारित होती. त्यानुसार ख्रिस्ती व मुस्लिम परकीय ठरतात. त्यामुळे त्यांच्या लेखनाचा नव्याने विचार करावा लागतो, असं मत त्यांनी मांडलं.

शहाजिंदे यांनी प्रेषित मुहंमद व महात्मा फुले यांच्या विचार व कार्यातील साम्यस्थळे विस्ताराने मांडली. मुस्लिम मराठी साहित्यातील प्रेरणा मांडताना ते म्हणतात, प्रेषित विचार हे पहिले ऊर्जाकेंद्र तर सुफी विचार हे दुसरे ऊर्जाकेंद्र आहे. फुले-शाहू-आंबेडकरी विचार हे तिसरे ऊर्जाकेंद्र आहे. या तीन ऊर्जाकेंद्रावर मुस्लिम मराठी साहित्याची उभारणी झालेली आहे. अशा पद्धतीने अनेक साहित्यिकांचं लेखन आहे. या सत्राचं संचलन जावेद पाशा कुरैशी यांनी केलं तर आभार रहीम शेख 'बंदी' यांनी मानलं.

या नंतर संध्याकाळी सहाच्या सुमारास 'मिर्ज़ा एक्सप्रेस' हा बहुचर्चित हास्य-विनोदाचा एकपात्री प्रयोग झाला. अमरावतीचे प्रसिद्ध विडंबन कवी मिर्ज़ा रफी अहमद बेग यांनी सुरेख सादरीकरण केलं. दररोजच्या जगण्यातील व्यवहार व संवादातून विनोद निर्मिती कशी होते, त्याची तपशीलवार व मिश्किल आढावा बेग यांनी घेतला. शिवाय 'मिर्ज़ाजी कहीन' या वृत्तपत्रातील सदरातील मनोरंजक प्रश्न व त्याची खुसखुशीत उत्तरेही त्यांनी सादर केली.

रात्री साडे सातच्या सुमारास फ़िरोज काज़ी लिखित व तुकाराम देवकर दिग्दर्शित स्त्री सुरक्षेवर आधारित 'सन्माननीय षंढांनो' नाटकाचं सादरीकरण झालं. ३५ मिनिटे चाललेल्या या प्रयोगात बीड जिल्ह्यातील कॉलेजवयीन मुलींनी उल्लेखनीय भूमिका सादर केल्या. पहिल्या भागात लैंगिक अत्याचार पीडित तरुणीची व्यथा होती. तर दुसऱ्या भागात हुंडा प्रथेच्या वेदना होत्या. पहिल्या भागाची संहिता उपस्थितांना धक्के देणारी ठरली.

नाटकातील संवाद, सादरीकरण व मांडणी उल्लेखनीय होती. अत्याचार पीडित स्त्रीकडे सामाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन समर्पकरित्या मांडण्यात आलेला होता. सामाजिक मानसिकता नाटकाच्या केंद्रस्थानी होती. या भागाचा शेवट धक्कादायक व प्रचंड भावनिक होता. परंतु त्यानंतर मांडलेल्या हुंडा प्रथेचा भाग आधीच्या धक्कातंत्रावर स्वार झाला. नाटकाच्या संहितेचा क्रम चुकला होता. पहिल्या भागानंतर शेवट झाला असता तर दर्शकांच्या मनावर तो विचार दीर्घकाळ ठसला असता. त्यांना गंभीर विषयावर विचार करण्यास वेळ लाभला असता. उपस्थितांनी टाळ्याच्या गजरात नाटकाचे स्वागत केलं.

रात्री आठ वाजता निमंत्रितांचं कवी संमेलन सुरू झालं. त्यात ३०पेक्षा अधिक बहुभाषिक कवी सहभाही होते. मंचावर २५पेक्षा जास्त कवी महोदय विराजमान झाले. त्यात कवयित्रींची संख्या कमी होती. नेहमीप्रमाणे उर्दू कवी व शायरांनी मैदान मारलं. उर्दू ग़ज़लला

(पृष्ठ क्र. ५०वर)

कठीण होत चालले आहे
आणि दिवसेंदिवस दुनियेशी टक्कर घेणेही. (११९)

तथापि ही हतबलता फार काळ टिकणारी नाही. विजिगीषू वृत्तीच्या कवयित्रीने सभोवतालच्या कुचंबणेतून बाहेर पडण्यासाठी आणि स्वतःला अभिव्यक्त करण्यासाठी कवितेला जवळ केले आहे. कारण कविता ही जिवाभावाची सखी वाटते, म्हणूनच कवयित्री लिहिते :

या कविताच आहेत माझ्या
संवेदनांचा प्रवास
या कविताच आहेत
माझ्या पाठीचा कणा
माझ्या अस्तित्त्वाचा मूलाधार
मला इथे तगवून ठेवलेल्या.
या कविता माझ्यासारख्याच
साध्यासुध्या, ओबडधोबड,
महानतेचा सोस नसलेल्या. (१२१)

चिंतनशीलता हा अंजली कुलकर्णी यांच्या कवितेचा स्थायीभाव असून ही कविता शब्दांचा फुलोरा फुलविण्यापेक्षा विचारचिंतनाला प्राधान्य देते.

अंजली कुलकर्णी यांची कविता अतिशय साधी, सोपी, सरळ, सुबोध आणि आशयसंपन्न आहे. ही कविता अंगावर येणारा वर्तमान अधिक गडद करते आणि वाचकाशी थेट संवाद साधत ती वाचकाला अंतर्मुख करते. आपला भयाण भोवताल अल्पाक्षरांत बांधण्यासाठी कवयित्रीने उपयोजिलेली रोजगाराचा पर्वत, विंडोतलं आकाश, निरर्थकाचा पसारा, पंखकापली पाखरं, स्वप्नविझली माणसे, अपरिहार्यतेची करुण मिठी, असहिष्णू फूत्कार, झिरपझऱ्यांचे आवेग, रुढीबाज प्रतीक, आदिम प्रेरणांचे चिरे, विषादाचा काळ, लालस नजरांचे ययाती, संवेदनांचा प्रवास इ. प्रतिमा-प्रतीके मोठीच अन्वर्थक आहेत.

सांस्कृतिक क्षेत्रातील दहशतवादाची जाणीव करून देणारी ही कविता आपल्या भूमिकेवर ठाम आहे. कवयित्रीचा आपल्या कवितेवर दृढ विश्वास आहे. म्हणून कवयित्री तितक्याच आत्मविश्वासाने लिहिते :

मी लिहिते तेव्हा
उसळतात लाटांवर लाटा
समुद्राला भरती येते
पूर्ण चंद्र बनून कविता
आसमंत उजळून घेते. (१११)

अंजली कुलकर्णी यांची कविता ही आत्मभानाची कविता आहे. कवयित्रीने व्यक्त केलेला आपल्या कवितेवरचा हा उदंड विश्वास सार्थ ठरावा.

●

शाबूत राहो हे लव्हाळे (कवितासंग्रह) अंजली कुलकर्णी, प्रकाशक : सृजनसंवाद, ठाणे, पृष्ठे : १२८, किंमत : रु. २५०/-

---

कलीम अजीम... (पृष्ठ क्र. ४६वरून)

उपस्थितांचा चांगला प्रतिसाद लाभला. उर्दू-हिंदीच्या तुलनेत मराठी कवी सादरीकरणात कमी पडलेले जाणवले.


सहभागी कवींमध्ये मुबारक शेख (सोलापूर), अब्दुल रहीम (चंद्रपूर), जमील अन्सारी (कामठी), संजय गोडघाटे (नागपूर), रजनी संबोधी (नागपूर), नेहा गोडघाटे (नागपूर), मुजफ्फर सय्यद (चिपळूण), भोला सरवर (नागपूर), खेमराज भोयर (नागपूर), मजीद बेग (हिंगणघाट), सय्यद मुजम्मील (वणी), फिरोज़ काज़ी, गौस पाशा (पालघर), इत्यादी होते.

मराठीतील बहुतांश कविता या सामाजिक आशयाच्या होत्या. त्यात काही राजकीयही होत्या. प्रतीकांवर आधारित कवितांनी रसिक-श्रोत्यांची चांगलीच दाद मिळवली. मंचावरील बहुतांश कमी नवोदित होते. अनेक कवींनी मुक्तछंदात सादरीकरण केलं. या सत्राचं अध्यक्षस्थान ज्येष्ठ कवी सिराज शिकलगार यांनी भूषविलं.

●

(उत्तरार्ध पुढील अंकी)

Registered R.N.I. No. MAHMAR/2001/09622
Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-37
Postal Regd. No. PCW/006/2024-2026
Posted at Pune PSO, GPO, Pune-411001
Published and posted on 1st and 16th of Every Month.
पाक्षिक परिवर्तनाचा वाटसरू, १६ ते ३१ मे २०२५ Date of Publication & Posting : 16-5-2025



१ ते १५ जून २०२५ । किंमत ४५ रु.

एकूण पृष्ठे ५२

पाक्षिक

परिवर्तनाचा वाटसरू

अनुक्रम

परिवर्तनाचा वाटसरू

मुस्लिम मराठी साहित्य : समन्वयाच्या दिशेने

(उत्तरार्ध)

कलीम अजीम

१०वे मुस्लिम मराठी साहित्य संमेलन २६-२७ एप्रिल २०२५ रोजी नागपूरात आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाच्या वृत्तांताचा दुसरा भाग.

लेखक पुणेनिवासी असून मुस्लिम समाज-संस्कृतीचे अभ्यासक व चिंतक आहेत.

kalimazim2@gmail.com

२७ तारखेला दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्राची सुरुवात 'संविधान जागर' कार्यक्रमाने झाली. या लघुनाट्याचे लेखक व गीतकार एम. एस. जांभुळे तर, दिग्दर्शक वीणा राऊत होत्या. ४० मिनिटे चाललेल्या या जागरात डॉ. आंबेडकरांची भूमिका, राज्यघटनानिर्मितीचा प्रवास, त्यातील कलमे, तरतुदी, मानवी हित व कल्याणाची भूमिका, उद्देश यांचा उहापोह झाला. संगीत नाट्यातून माध्यमातून लोकशाही हक्काची प्रभावी मांडणी करण्यात आली. सहभागी कलावंतात वीणा राऊत, भीमराव गायकवाड, एम. एस. वानखेडे, मंगला जांभुळे, जया कलीहारी, नंदा पंचभाई, सुनंदा गायकवाड, मनिषा पाटील, रंजना लोखंडे, वंदना धनविजय, संध्या वारके व सीमा थूल होत्या.

दुसरे सत्र कथाकथनाचं होतं. सकाळी साडे अकराच्या सुमारास त्याची सुरुवात झाली. त्याचं संचलन सुरैया जहागीरदार यांनी केलं, तर अध्यक्षपद अय्यूब नल्लामंदू यांनी भूषविलं. सहभागी कथाकारात आर. आर. पटेल (अमरावती), गौस पाशा शेख, (पालघर), एस. एन. पठाण (संमेलनाध्यक्ष), जीनत फरहीन (औरंगाबाद), विलास काळे (नागपूर), शिरीन शेख (बीड), खाजा बागवान (सोलापूर), नसीम जमादार (कोल्हापूर) होत्या.

सहभागी सर्व कथालेखक नवेदित होते. त्यामुळे वाचन व कथन यातील नेमका फरक त्यांच्या लक्षात आला नाही. एकूण सर्वच कथा सुमार दर्जाच्या होत्या. संमेलनाध्यक्ष पठाण मंचावर बसून होते. नवेदितांचा उत्साह पाहून त्यांनाही मोह आवरता आला नाही. आपल्या आत्मकथनातील एक तुकडा त्यांनी कथा म्हणून सादर केला. विलास काळे यांनी आंबेडकरांच्या आयुष्यातील एक प्रसंग कथा म्हणून सादर केला, तो सोडला तर एकही कथा स्मरणात जागा करू शकली नाही.

दरम्यानच्या काळात सभागारात उपस्थित झालेल्या काही मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. साताऱ्याहून आलेल्या अभयसिंह जगताप यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांनी आपलं मनोगत व्यक्त केलं. वर्तमान राजकारणात शिक्षणाचं महत्त्व यावेळी त्यांनी अधोरेखित केलं. समन्वयाची परंपरा व सलोखा अबाधित ठेवण्यासाठी सर्वांना प्रयत्नशील असण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

या नंतर 'मैं फातिमा बोल रही हूं' हे हिंदी भाषी एकपात्री नाटक सादर करण्यात आलं. त्याचं लेखन संजय सायरे यांनी केलं होतं. तर प्रस्तृती प्रबुद्ध रंगभूमी नागपूर यांची होती. सुप्रिया वालदे-माटे या फातिमाच्या मध्यवर्ती भूमिकेत होत्या. यात संवादातून फातिमा शेख

यांच्या जीवनकार्याविषयी माहिती दिली गेली. शिवाय महात्मा फुले, सावित्राबाईंच्या क्रांतिकार्याविषयी आढावा होता. उस्मान शेख व फातिमा शेख यांच्या ऐतिहासिक कार्याची महती नाटकातून अभिव्यक्त झाली. १७ मिनिटांचे हे लघुनाट्य अनेक अर्थाने उल्लेखनीय ठरले.

दुपारी दीडच्या सुमारास दुसरे सत्र सुरू झाले. याचं संचलन मलेका शेख यांनी केलं तर अध्यक्षता जमात ए इस्लामीचे नौशाद उस्मान यांनी केली. रागीब अहमद (जळगाव), सैफ असरे (चिपळूण), हसीब नदाफ (सोलापूर) हेही सहभागी होते. 'मुस्लिमांचे शिक्षण, आरक्षण, सरंक्षणाचे प्रश्न व प्रसार माध्यमांची भूमिका' असा या परिसंवादाचा विषय होता.

सुरुवातीला जमात ए इस्लामीचे सैफ असरे यांनी मुस्लिमांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीवर भाष्य केलं. त्यांनी आपल्या विवेचनात हिलाल अहमद, मुहंमद संजीर आलम आणि नज़ीरा परवीन यांनी यू. एस. इंडिया पॉलिसी इन्स्टिट्यूट आणि सेंटर फॉर पॉलिसी रीसर्च या दोन संस्थांच्या वतीने केलेल्या संशोधनाच्या आधारे अहवालाची मीमांसा केली. 'रिथिंकिंग ॲफर्मेटिव्ह ॲक्शन फॉर मुस्लिम्स इन कनटेम्परर इंडिया' या शीर्षकाचा हा अहवाल आहे. त्यातील आकडेवारी मांडत त्यांनी मुस्लिमांची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थिती अधोरेखित केली. त्यातील सामाजिक न्यायाची भूमिका मांडली. भाजपच्या विखारी राजकारणात समाजाची स्थिती अधिकाधिक खालावत चालली आहे, असं निरीक्षण त्यांनी मांडलं.

हसीब नदाफ यांनी मुस्लिम ओबीसी चळवळ व मुस्लिम आरक्षणविषयक मांडणी केली. कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीतील प्रशासकीय कमतरता त्यांनी अधोरेखित केल्या. सत्तापक्षाविषयी अनास्था व्यक्त करीत ते म्हणतात, मुस्लिम समाज दारिद्र्यरेषेखाली आहे. भाजप सरकारवर आमचा विश्वास नाही, पण यापूर्वीच्या काँग्रेस, समाजवादी, बंगालमधील कम्युनिस्ट सरकारने मुस्लिम प्रश्नांकडे दुर्लक्ष केलं आहे. व्होट बँक म्हणून आमचा वापर झालेला आहे. भाजपवर टीका करताना ते म्हणतात, सच्चर समितीच्या शिफारशीनुसार वक्फ विधेयक आणलं असं भाजप सांगत आहे, पण समितीने शिक्षण, आरक्षण, सुरक्षा तसेच आर्थिक बाबतीत शिफारशी केलेल्या होत्या, त्या पूर्ण करण्याचं काय?

धर्माच्या आधारावर आरक्षण नाकारणाऱ्या घटनात्मक त्रुटींवर भाष्य करत नदाफ म्हणतात, ४० जमाती मुस्लिम ओबीसीत आहेत. १३-१४ भटक्या विमुक्त प्रवर्गात आहेत. १९५०च्या राष्ट्रपतीच्या अध्यादेशात शीख व हिंदू जमातींना आरक्षणाची सवलत मिळाली. या अध्यादेशाने धर्माच्या नावाने आरक्षण नाकारलं. परंतु अनुसूचित जातीत ४-५ मुस्लिम जमाती आहेत, अनुसूचित जमातीतही काही प्रवर्ग आहेत, केवळ धर्म परिवर्तन केलं म्हणून अनेक मुस्लिम जमाती या सवलतीपासून वंचित आहेत. राज्यघटनेच्या नावानेच हे अधिकार नाकारले जात आहेत. मुसलमान समाजातील जातसदृश्य आडनाव धारकांना जातीचे कुठलेही पुरावे न मागता जात पडताळणीची प्रमाणपत्रे देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

रागीब अहमद यांनी मोदींच्या सत्ताकाळातील द्वेषमूलक गुन्ह्यामुळे समाजाला कशी झळ बसत आहे, याची विस्तृत आकडेवारी मांडत घटनाक्रम सांगितला. प्रसारमाध्यमांच्या भगवेकरणावर त्यांनी कठोर प्रहार केला. ते म्हणतात, संघ पुरस्कृत मंडळीकडून व राज्य पुरस्कृत दहशतवादाकडून मुस्लिमांना संरक्षणाची गरज भासू लागली आहे. राज्यघटनेवर हात ठेवून शपथ घेतलेला एक मंत्री जेव्हा मुस्लिम समुदायाविरोधात चिथावणीखोर भाषा वापरतो, मस्जिदमध्ये घुसून मारू म्हणतो, अशावेळी शासनसंस्था गप्प राहते. या प्रवृत्तीपासून मुस्लिमांना संरक्षणाची गरज आहे.

मुस्लिमांच्या व्यापारावर बहिष्कार घालण्याच्या वृत्तीवर बोट ठेवत ते म्हणतात, मुस्लिमांना मारहाण करून, हल्ले करून त्याचं चित्रीकरण केलं जाऊ लागलं

आहे. संघाकडून मुस्लिम समाजावर मानसिक दडपण आणण्यासाठी असं केलं जात आहे. सौदीत जाऊन मुसलमानांच्या गळाभेटी घ्यायच्या. त्यांच्याशी लाखो कोटींचा व्यापार करायचा व भारतात मुस्लिमांना आर्थिक बहिष्काराची भाषा करायची, हे धोरण मुसलमानांचे मानसिक खच्चीकरण करण्यासाठी आहे. हे दुटप्पी धोरण बहुसंख्याक समाजाने समजून घेण्याची गरज आहे.

जमात ए इस्लामीचे नौशाद उस्मान यांनी अध्यक्षीय समारोप करताना मुस्लिमांनी भगव्या संघटनांच्या दुष्प्रचारांना उत्तर देण्यासाठी आधुनिक प्रसारमाध्यमांचा वापर करावा, अशी सूचना केली. ते म्हणतात, मुस्लिमच नाही तर बहुसंख्याक हिंदूंनीही सामाजिक समन्वयाचे प्रयत्न करण्याची गरज आहे. मुस्लिमांनी द्वेष मोहिमांचा भाग होऊ नये. द्वेष मोहिमेचा संविधानिक पद्धतीने प्रतिवाद केला पाहिजे.

फेसबुकवर द्वेष व तिरस्कार पसरवणारे खूप आहेत, एखाद्या दुखद घटनेवर हसणाऱ्या विकृतांची संख्या मोठी आहे. अशांना उत्तर देताना आक्रमक होण्याची गरज नाही, असं त्यांनी म्हटलं.

दुपारी दोनच्या सुमारास तिसरा परिसंवाद सुरू झाला. 'अल्पसंख्याकावरील आर्थिक, सांस्कृतिक हल्ले व लोकशाहीची भूमिका' असं त्याचं नाव होतं. त्याची अध्यक्षता अस्लम बारी यांनी केली. वक्ते म्हणून कुलदिप रामटेके (नागपूर), ॲड. जुबेर शेख (धुळे), कलीम अज़ीम (पुणे), एस. एस. पठाण (गडचिरोली), अमिताभ पावडे (नागपूर) लाभले होते.

ॲड. जुबेर शेख यांनी परिसंवादाची सुरुवात करताना समाज म्हणून आपण तडजोडीची भूमिका वारंवार स्वीकारत गेलो, तर सांस्कृतिक हल्लेखोरांचं फावतं, असा विचार मांडला. मुसलमानांना एकेश्वरी तत्त्वांमध्ये तडजोड करण्यासाठी दबावतंत्र वापरलं जात आहे. अशा प्रतिक्रियांना उत्तरे देताना प्रागतिक संघटकांकडून सांगितलं जातं, तो मुद्दा मिटवून टाका, तो विषय संपला की त्यांच्याकडे दुसरं काही उरणार नाही. अशा तडजोडी स्वीकारल्या की, हल्ले वाढतच जाणार. इस्लामवरील हल्ला याच प्रक्रियेचा भाग आहे, असंही त्यांनी म्हटलं.

कुलदिप रामटेके यांनी वर्तमान हिंदुत्व राजकारणावर प्रहार केला. हिंदुत्व विचारांच्या सरकारमध्ये न्यायालयातही न्याय मिळणार नाही, असं विधान त्यांनी केलं. म्हणतात, मी त्याचा साक्षीदार आहे, अल्पसंख्याकांना भारताच्या सर्वोच्च न्यायालयात न्याय मिळू शकत नाही.

पुढे ते म्हणतात, हिंदुत्व धर्माशी संबंधित बाब नाही. ते एक राजकारण आहे. काँग्रेसला हिंदुत्व राजकारणाविषयी प्रश्न केला जातो. मुळात काँग्रेसच्या चुकांचा सुगावा लागतो, तेव्हा कुठे भाजपचे राजकारण वाढते. काँग्रेसकडे त्याचं उत्तर नाही. यांचं उत्तर शोधण्यासाठी शाहू, आंबेडकरांकडे जावं लागेल. त्यांच्या विचारसरणीत या सर्व प्रश्नांचं उत्तर मिळू शकतं.

वर्तमान समस्यांचे निराकरण सांगताना ते म्हणतात, जेव्हा एखादा हिंदू कर्मठ होतो, तेव्हा त्याला असं गृहीत धरून चालावं लागेल, की पलीकडे त्याला कर्मठ मुसलमान, कर्मठ बुद्धिस्ट भेटतील. धर्मनिरपेक्षतेविषयी लवचिकता नसेल तर कुठलेही उपाय मिळणार नाही. या प्रश्नांचे उत्तर राजकारणात शोधत असाल तर ते मिळणार नाही. त्यासाठी सांस्कृतिक चळवळी उभ्या कराव्या लागतील. अशा चळवळीशिवाय तुम्हाला उत्तर मिळू शकणार नाही. कविता लिहिल्याने ते तर नक्कीच मिळणार नाही.

मुस्लिम विषयाचे चिंतक कलीम अज़ीम यांनी भाजप-संघाच्या मुस्लिमांविषयीच्या कुरघोड्यांवर भाष्य केलं. धर्मनिरपेक्षता, संस्कृती व समन्वयाच्या प्रक्रियेविषयी मुस्लिम धर्ममार्तंडांनी दाखविलेल्या अनास्थेमुळे भाजप-संघाचे मुसलमानांवर सांस्कृतिक हल्ले सुरू झाले आहेत. त्याला सांस्कृतिक चळवळीतूनच उत्तर दिल्याशिवाय त्यातून मार्ग नाही, असंही त्यांनी

म्हटलं.

ते म्हणाले, न्यूज चॅनेलवर चर्चेत दाढीधारी मौलवी बसवणे व त्यांना भाजप-संघ प्रवक्त्याकडून नामोहरम करणे, समस्त मुसलमानांचा प्रतिनिधी म्हणून त्यांना झोडपणे हा सर्वसामान्य मुसलमानांवर केलेला सांस्कृतिक आघात आहे. चॅनेलने बसवलेला प्रतिनिधी कुठल्यातरी कागदोपत्री राष्ट्रीय संघटनेचा राष्ट्रीय अध्यक्ष असतो. अशा संघटना न्यूज चॅनेलवर पदे लिहिण्यासाठी अस्तित्वात आणल्या जातात. हे मौलवी आर. एस. एस व भाजपशी थेट संबंधित असतात. हा एका व्यापक कारस्थानाचा भाग आहे, हे समजून घेतले पाहिजे.

पुढे ते म्हणतात, राष्ट्रीय मुस्लिम मंचाच्या माध्यमातून संघाने मुस्लिम समाजात शिरण्याचे काम सुरू केलेलं आहे. त्याला बऱ्यापैकी यशही आलेलं दिसतं. संघाच्या शाखेत तयार झालेले मुस्लिम भाष्यकार, नेते, मौलवी मुस्लिमांच्या साहित्यिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक सोहळ्यांना हजेरी लावतात व तिथं जाऊन आर. एस. एस.चा कथित सुधारणावाद म्हणून अजेंडा सांगतात. या सांस्कृतिक हल्ल्याकडे दुर्लक्ष करता येत नाही.

मदरसा शिक्षण पद्धतीविषयी संघाच्या धोरणांचा समाचार घेताना त्यांनी म्हटलं, उत्तर प्रदेशमध्ये संघाने मदरसे सुरू केले आहेत. त्याचा अभ्यासक्रमही इस्लामसोबत वैदिक ठेवला आहे. इस्लामविषयी सतत द्वेष व तिरस्कार बाळगणारा आणि मुस्लिमद्वेष शिकवणारा संघ व त्याचे प्रशिक्षक मदरशातील विद्यार्थ्यांना कोणते शिक्षण देतील? इथून उत्तीर्ण होऊन बाहेर पडलेला मुल्ला समाज हिताचा व्यापक विचार करेल का? तो अधिकाधिक कर्मठ असू शकतो, धर्मांध असू शकतो. इस्लामचं विकृतीकरण व सबंध मुसलमानांचं अमानवीकरण करण्यासाठी त्या मुल्लांचा वापर होईल.

गडचिरोलीचे एस. एम. पठाण यांनी, मुस्लिम मराठी साहित्य चळवळ ही मुसलमानांना मिळालेली मोठी देणगी आहे, असं म्हटलं. उर्दू भाषेवर हल्ले होतात. कारण बहुतांश मुस्लिम उर्दू भाषेत शिक्षण घेतो. भाषा कोणत्याही जात, वंश, पंथाची नसते, ती क्षेत्रीय असते. उर्दूवर होणारा हल्ला हा सांस्कृतिक आहे. या देशाचा शत्रू कोण, हा सर्वांनीच विचार करण्यासारखी बाब आहे.

अर्थशास्त्राचे अभ्यासक अमिताभ पावडे यांनी हिंदुत्ववादी सत्ताकाळात मध्यममार्गी भूमिका घेणाऱ्यांवर प्रहार केला. ते म्हणतात, दोन डगरींवर पाय ठेवून चालता येणार नाही. एक तर संविधानवादी, विषमताविरोधी व्हावं लागेल किंवा धर्मवादी होऊन विषमतेचा पुरस्कार करावा लागेल.

धर्मवाद्यांनी कष्टकरी समाजाला बहिष्कृत केलं असं सांगून ते पुढे म्हणतात, ओबीसी ५२ टक्के, १६ टक्के दलित, १४ टक्के मुस्लिम, ८.६ टक्के आदिवासी हा एकूण ८० टक्के समुदाय आहे. परंतु केवळ अडीच टक्के लोक त्यांच्यावर शासन करत आहेत, अत्याचार करत आहेत. या धर्मवाद्यांना जो जो कष्टकरी दिसला त्याला धरून शूद्राचं लेबल लावलं. शेतकरी, दलित, मुस्लिम आणि आदिवासी कष्टकरी आहे, धर्मवादी व्यवस्थेने त्याला शूद्र घोषित केलं. आज त्याला अतिरेकी ठरवण्यात येत आहे. मग समाजबाह्य बहिष्कार टाकला जातो. या कृतीचा आपण निषेध केला पाहिजे.

अर्थकारणाविषयीच्या अनास्थेवर ते म्हणतात, आपण आपल्या प्रश्नांची उत्तरे राजकारणात व समाजकारणात शोधतो परंतु अर्थकारणात कधी शोधली आहेत का? सर्वच प्रश्नांची उत्तरं या अर्थकारणात आहेत. भारत कृषिप्रधान म्हटला जातो पण खरंच तशी परिस्थिती आहे का. तसं असेल तर किती विषयात शेतीचे शिक्षण होतं. शेतकऱ्यांना खलिस्तानवादी तर गडचिरोलीतील आदिवासींना नक्षलवादी म्हटलं जातं.

पुढची मार्मिक टिप्पणी करून त्यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला, अमेरिका व युरोपचा माणूस रोजगाराची संधी नसल्यामुळे उपाशी आहे, परंतु

भारतातील माणूस १२-१२ तास कष्ट करूनही उपाशी आहे. कारण इथली व्यवस्था त्याला तसं करायला भाग पाडते, ही व्यवस्था समजून घेतली पाहिजे.

अध्यक्षीय समारोप करताना अस्लम बारी यांनी भाजपच्या शासन प्रणालीवर टीका केली. भाजपने सत्तेच्या राजकारणासाठी समाजात विभागणी केली आहे, असंही त्यांनी म्हटलं. मुस्लिम विद्यार्थ्यांच्या सवलती बंद करण्याच्या मुद्द्यावर बोलताना बारी म्हणतात, विधानसभेपूर्वी सरकारने 'मार्टी'ची (मौलाना आझाद रिसर्च ट्रेनिंग इन्स्टिट्यूट) घोषणा केली. निवडणुका झाल्या, पण पुढे काहीही झालं नाही. बजेटही नाही. मुस्लिम समाजातील ओबीसी प्रवर्गातील स्पर्धा परीक्षकांना महाज्योतीची सवलत होती, ईबीसी आधारित मुस्लिमांना अमृत योजनेची सवलत होती, 'मार्टी'ची घोषणा झाली अन् या दोन्ही ठिकाणाहून मुस्लिम विद्यार्थी बाहेर फेकले गेले.

प्रशासकीय योजना जाहीर होतात पण त्याची योग्य अंमलबजावणी होत नाही, त्यामुळे सर्व जाति-धर्मातील सजग नागरिकांनी या योजना व त्याच्या अंमलबजावणीवर पुरेसं लक्ष देण्याची गरज असल्याचं मत व्यक्त करत त्यांनी आपलं भाषण संपवलं.

यानंतर सावित्री-फातिमाबींच्या लेकीचं कविसंमेलन पार पडलं. त्याचं अध्यक्षस्थान तहसीन मसुदअली (लातूर) यांनी भूषविलं तर संचलन नसीम जमादार (कोल्हापूर) यांनी केलं. सुरैय्या जहागीरदार (सोलापूर), शिरीन शेख (बीड), ज्योती डोळे (उदगीर), सारिका देशमुख (उस्मानाबाद), ज्योती जडोले (उमरगा), मेहमूदा शेख (देहू), शुभांगी भोयर, अनघा मेश्राम (सोलापूर), निशिगंधा गव्हाणे, (सावनेर), रुखसाना पठाण (गडचिरोली), रजनी संबोधी (नागपूर), रोशनी गणवीर (नागपूर) इ. कवियत्रींचा त्यात सहभाग होता. सहभागींनी मराठी, हिंदी अशा द्विभाषी रचनांचं सादरीकरण केलं.

समारोप

२७ एप्रिल रोजी संध्याकाळी पाचच्या सुमारास समारोप सत्र सुरू झालं. त्याची अध्यक्षता श. नू. पठाण यांनी केली. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. फिरदोस मिर्ज़ा, माजी खासदार हुसैन दलवाई लाभले होते. स्वाती कराड (पुणे), जावेद पाशा कुरैशी (नागपूर), रमेश पिसे (नागपूर), अस्लम बारी (नागपूर), प्रभू राजगडकर (नागपूर), के. जी. पठाण (सांगली), सुरैय्या जहागीरदार (सोलापूर), फारुख शेख (नाशिक), हसीब नदाफ (सोलापूर) इत्यादी मंचावर होते.

जावेद पाशा यांनी आपल्या भाषणात दोन दिवसीय कार्यक्रमाची उजळणी केली. संमेलनात मुस्लिम, ख्रिस्ती, दलित आणि आदिवासी समुदायाच्या मूलभूत प्रश्नांवर चर्चा झाली, ही आमची बांधिलकी असल्याचं त्यांनी सांगितलं. मुस्लिमांनी ज्ञाननिर्मितीत योगदान दिलं पाहिजे असं सांगत ते म्हणतात, मुस्लिम (नागपूरच्या) उरूसावर दोन कोटी खर्च करतात, पण त्याच्या दोन-चार दिवसातच दंगल होते. त्याचा प्रभाव जास्त काळ टिकून राहत नाही. त्याऐवजी ५-१० लाख रुपये पुस्तकावर खर्च केली तर १० पिढ्या प्रबुद्ध होतील.

पाशा यांनी आर्थिक बहिष्कार मोहिमेचा समाचार घेतला. म्हणतात, आर्थिक बहिष्कारात वस्तू कोणाकडून खरेदी कराव्या हे सांगितलं जातं. त्यातील सर्व नावं वरिष्ठ जात-वर्णाची असतात. त्याचाच अर्थ दलित, मागास, ओबीसींकडून वस्तू खरेदी करू नये, असंही त्यातून दाखवलं जात आहे.

दलित, आदिवासी व मागास मुस्लिमांनी खुलेपणाने आपली व्यथा व वागणुकीविषयी बोलावं, असं केल्यास समदुःखी लोकांचा, समुदायाचा गोतावळा तुमच्या बाजूने येईल, अस आवाहनही त्यांनी केलं. मुस्लिमांच्या सामाजिक व सांस्कृतिक स्थितीविषयी भाष्य करताना पाशा पुढे म्हणाले, मुस्लिम समाजाची संस्कृती लोकांसमोर आली पाहिजे. आपण लिहिते झालो पाहिजे, व्यक्त झालो पाहिजे. आपल्या खऱ्या वेदना

बहुसंख्याक समाजापर्यंत पोहोचवा, धर्मांतरित मुस्लिमांचा खरा इतिहास समाजापुढे येऊ द्या, त्यासंदर्भात लिखाण करा.

प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले फिरदौस मिर्ज़ा यांनी अनेक मुद्द्यांना स्पर्श केला. वर्तमान राजकीय वातावरण व हिंदुत्वआधारित द्वेषनीतीच्या धोरणावर त्यांनी प्रहार केला. ते म्हणतात, घटनात्मक पदावर बसलेले व्यक्ती, मंत्री द्वेषाची भाषा बोलतात व त्यास खपवून घेतलं जातं. राज्यघटना निर्मितीनंतर धर्म घरात गेला. दाराच्या बाहेर प्रत्येक नागरिक भारतीय असतो आणि भारतीयत्वच हा त्याचा सामाजिक धर्म असतो, असंही त्यांनी सांगितलं.

मुस्लिमांनी अभिव्यक्त होण्याची भाषा बदलली पाहिजे. मुस्लिम शापित असलेल्या भाषेत व्यक्त होतो. त्याने उर्दूऐवजी मराठीत व्यक्त व्हावं, आज उर्दू अस्पृश्य झालेली भाषा आहे. उर्दूऐवजी हिंदी, इंग्रजी भाषा शिकावी. आधुनिक भाषांची संस्थानं उभी करावीत. आपला खरा इतिहास, लोकभाषेत पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवावा, असं आवाहनही त्यांनी केलं. ज्यांची मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकतात, ते मराठीच्या अस्मितेसाठी भांडत आहेत, असा टोमणाही त्यांनी मारला. इतरांकडून धर्मनिरपेक्षतेची अपेक्षा केली जाते, पण आपण किती धर्मनिरपेक्ष आहोत, असे स्वत:ला विचारावे, असा प्रश्न सोडून त्यांनी भाषणाचा समारोप केला.

हुसैन दलवाई यांनी भाषणाच्या सुरुवातीला मुस्लिम मराठी साहित्य चळवळ स्थापन करून मुस्लिमांना उपकृत केले, अशी भावना व्यक्त केली. शिक्षण क्षेत्रातून मराठी भाषा हद्दपार होऊन इंग्रजीचे फॅड निर्माण होत आहे, अशा स्थितीत ही चळवळ मराठी भाषा जनमानसात रुजवू पाहते, याविषयी त्यांनी संघटकांचं अभिनंदन केलं.

भाजप-संघाच्या मुस्लिमद्वेषी प्रचारावर दलवाईंनी हल्ला चढवला. म्हणाले, इथला हिंदू शहाणा आहे, त्याने नीट विचार केलेला आहे. तो संवेदनशील आहे. सगळे हिंदू विरोधात आहेत, असं मुस्लिमांनी समजू नये. मूठभर हिंदू लोकांचं मन कलूषित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. बहुजन समाजाला जोडण्यासाठी अशी संमेलने महत्त्वाची आहेत.

मुसलमानांनी नव्या युगाची वाटचाल केली पाहिजे. त्यांनी आधुनिक शिक्षण घेतलं पहिजे. उर्दूपेक्षा मराठीत शिकलं पाहिजे. इंग्रजीवर प्रभुत्व काबीज केलं पाहिजे, असंही त्यांनी म्हटलं. प्रेषितांनी सर्वांना धर्मसमुदायाला बरोबर घेऊन चालण्याचा संदेश दिला, हे सर्व मुस्लिमांना आठवण करून देण्याची गरज असल्याचं आवाहन त्यांनी जाता-जाता केलं.

दोन दिवस संमेलनाची सर्व व्यवस्था व देखरेख सांभाळणारे अस्लम बारी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे ममता मून यांचाही सन्मान करण्यात आला. त्यानंतर पुण्याच्या माईर्स एमआयटीचे सर्वेसर्वा विश्वनाथ कराड यांचा 'ए.पी.जे. अब्दुल कलाम सामाजिक सद्भावना पुरस्कार' देऊन विशेष गौरव करण्यात आला. संमेलनाध्यक्ष पठाण यांनी त्यांच्याविषयी उपस्थितांना माहिती देऊन सन्मानपत्राचं वाचन केलं. कराड यांच्या वतीने त्यांच्या कन्या स्वाती कराड यांनी हा सन्मान स्वीकारला व सत्काराला उत्तरही दिलं. त्यानंतर काही महत्त्वाचे ठराव मंजूर करण्यात आले.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. श. नू. पठाण यांनी हिंदू-मुस्लिम सामाजिक सद्भावनेचा पुरस्कार केला. आपल्या आत्मकथेसह विविध पुस्तकं त्यांनी का लिहिली, त्याची गरज काय होती, याची मीमांसा केली. भाजपच्या वाचाळ पुढाऱ्यांचं नाव न घेता त्यांनी टिप्पणी केली, ...आपण जोडायचं काम करायचं. पैगंबर म्हणाले होते, जो अभद्र भाषा बोलतो तो मुसलमान नाही. तेव्हा आपण अशा प्रकारची कुठलीही भाषा वापरणार नाही, भलेही दुसरे ती वापरू दे.

या साहित्य संमेलनाचा हेतू हिंदू-मुस्लिम ऐक्य

आहे असं सांगताना ते म्हणतात, तरुण साहित्यिकांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याचं लेखन करावं. एकमेकांवर गरळ व द्वेष उगाळून काहीही साध्य होणार नाही. दोन भाऊ भांडत असताना त्या दोघांचा ऱ्हास होतो.

समारोप सत्रात सभागृह पूर्णपणे भरला होता. मान्यवर मंडळी व प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. समारोप सत्राचं संचलन अस्लम बारी यांनी केलं, तर आभार फारुख शेख यांनी मानलं. राष्ट्रगीताने संमेलनाची सांगता झाली.

नागपूर शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा संयोजन समितीत समावेश करण्यात आला होता. भारतीय मुस्लिम परिषद, सेंटर फॉर सोशल रिफॉर्म अँड एम्पॉवरमेंट, फुले-शाहू-आंबेडकर विचारमंच, डॉ. मेघनाथ साहा सांस्कृतिक विचार मंच, छवी पब्लिकेशन आणि राष्ट्रसंत साहित्य अभ्यास मंडळ या संस्थांनी संमेलनाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

काही निरीक्षणं

मुस्लिमांनी आयोजित केलेल्या साहित्यिक-सांस्कृतिक सोहळ्यांना ठरावीक मान्यवर सोडले तर नागरी समाजाची उपस्थिती फार कमी असते. इथंही ती जाणवली. त्याची विविध कारणं होती. त्यापैकी काही म्हणजे सांस्कृतिक बाबतीत असलेली अनास्था व वैयक्तिक हेवेदावे! व्यक्तिगत दोषांना पुढे करत या सोहळ्याला गैरहजर असणाऱ्या मान्यवरांची संख्या मोठी असते. शिवाय नागपूर सारख्या शहरात उन्ह्याळ्यात संमेलन होत असल्याने प्रवासाची दगदग सहन होऊ न शकल्याने अनेकांची अनुपस्थिती जाणवली.

आत्तापर्यंत झालेल्या सर्वच संमेलनाध्यक्षापैकी केवळ फ. म. शहाजिंदे हजर होते. साहित्यिक, लेखक व मान्यवरांना निमंत्रण देण्यातही योग्य प्रक्रिया पार पाडली गेली नाही. मान्यवर पाहुण्यात मावळते अध्यक्ष अब्दुल कादर मुकादम (मुंबई), बशीर मुजावर (पुणे) यांची नावं होती. परंतु त्यांच्याशी कोणीही संपर्क साधला नाही किंवा त्यांना टपालाद्वारे पत्र तथा निमंत्रण पत्रिका पाठवली गेली नसल्याचं त्यांनी प्रस्तृत लेखकाला कळवलं.

उद्घाटन सत्राच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून खलील मोमीन व रावसाहेब कसबे यांची नावं होती. ते संमेलनस्थळी दिसले नाहीत. निवेदक किंवा आयोजकांच्या तोंडी त्यांचं नावही नव्हतं. त्यांच्याशीही रितसर संपर्क प्रस्थापित केला गेला नाही, असं कळलं.

२०१८ला पुण्यातील संमेलनाचे अध्यक्ष राहिलेले अलीम वकील यांचही नाव एका परिसंवादात अध्यक्षस्थानी होते. परंतु त्यांनाही रितसर निमंत्रण देण्यात आलं नसल्याचं कळलं. फोनवर संमेलन असल्याचं सांगून येण्याचा आग्रह धरण्यात आला. वर उल्लेखित एकाही साहित्यिक, लेखक, पूर्वसंमेलनाध्यक्षांना निमंत्रण पत्रिका पाठविण्यात आली नाही.

अब्दुल कादर मुकादम यांना अशा प्रकारचं संमेलन होत आहे, याविषयी कल्पनाच नव्हती. त्यांना कुठून तरी फोनवर पत्रिका मिळाली. त्यात आपलं नाव वाचून त्यांनी फेसबुकवरून संमेलनाला उपस्थित होणार नसल्याचं जाहीर केलं. सर्वच मान्यवर वक्ते, अभ्यासक व साहित्यिकांना फोनवरून कळविण्यात आल्याचं समजलं.

परिसंवादाचे विषय व वक्ते ठरविण्यासाठी फेब्रुवारीत एक व्हॉट्सॲप पोस्ट फिरत होती. साहित्य परिषदेच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर आलेल्या या पोस्टमध्ये संमलनात अपेक्षित परिसंवादाचे विषय द्यावे व त्यात बोलू इच्छिणाऱ्या वक्त्यांनी आपली नाव व संपर्क पाठवावेत, असं सूचवलं होतं. सोलापूरच्या केंद्रीय मंडळाकडून हा संदेश वारंवार टाकला जात होता. याच पद्धतीने 'मऱ्हाटवाणी' या स्मरणिकेत लेखकांना लेखन पठविण्याची विनंती होती.

पुण्याच्या माइर्स एमआयटीचे सर्वेसर्वा डॉ. विश्वनाथ कराड यांना सद्भावना पुरस्कार का दिला गेला, हा प्रश्न अनुत्तरित होता. त्यांचं शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील

कार्य नक्कीच कौतुकास्पद आहे, त्यामुळे त्यांचा यथोचित सन्मान नित्य होत राहतो. परंतु मुसलमानांच्या सांस्कृतिक सोहळ्यात मुस्लिमांच्या कार्याचा गौरव का नाही? पुण्याच्या साहित्य संमेलनातही कराड यांना मौलाना आज़ाद यांच्या नावे सद्भावना पुरस्कार दिला गेला, त्याचंही कारण अद्याप कळू शकलं नाही.

विदर्भात सामाजिक सलोखा असो वा शिक्षण क्षेत्रात क्रांतिकार्य करणारे अनेक मुस्लिम आहेत. शिवाय सामाजिक व सांस्कृतिक चळवळीत उल्लेखनीय कार्य बजावणारेही आहेत. त्यांना का डावललं गेलं? वास्तविक, अदिबा अनम या यवतमाळच्या मुलीने महाराष्ट्रातील पहिली 'मुस्लिम महिला आयएएस' म्हणून बहुमान मिळवला. २२ एप्रिल २०२५ रोजी लागलेल्या निकालात अदिबाने देशभरात मुस्लिमांचं नाव उज्ज्वल केलं. आयोजकांना ही तरुणी दिसली नाही का?

किंबहुना सुरुवातीच्या भागात नोंदवल्याप्रमाणे काही मान्यवरांचा सत्कार जरूर केला गेला, पण त्यात असा विशेष गौरव नव्हता. एकाच साहित्य संमेलनाच्या मंचावर एकाच व्यक्तीला दोनदा एकाच प्रकारचा पुरस्कार देण्याचं काय प्रयोजन? पुरस्कार पुण्याच्याच व्यक्तीला द्यायचा होता, तर इथंही शिक्षण व सामजिक कार्यात उल्लेखनीय कार्य करणारे अनेकजण आहेत.

संमेलनस्थळी पुस्तकांचे तीन-चारच स्टॉल्स होते. त्यातही मुख्य प्रवाही प्रकाशकांचे ग्रंथ नव्हते. मुस्लिम मराठी साहित्य, त्याचे लेखक व चळवळीविषयी पुस्तकं कुठेच आढळली नाही. ग्रंथ विभागाला बघ्याची गर्दी होती. ग्राहकांचा प्रतिसाद नाही, अशा प्रकारचा सूर विक्रेत्यांचा होता. ग्रंथ खरेदीला साहित्यिक, रसिक, श्रोत्यांनी दाखवलेली अनास्था मुस्लिम मराठी साहित्य चळवळीचं भविष्य वर्तवत होती.

खाली मुख्य प्रवेशद्वाराच्या बाजुला पुण्याच्या संदेश लायब्ररीचे 'आधुनिकता व इस्लाम' या विषयावर पोस्टर प्रदर्शन लागलं होतं. तिथं प्रदर्शन पाहणाऱ्यांची गर्दी होती. इथं मराठी भाषेतील कुरआन व अन्य इस्लामिक पुस्तकं वाचकांना मोफत वितरित केली जात होती.

अध्यक्ष निवडीचा वाद

संमेलनाच्या घोषणेपासून अध्यक्ष निवडीविषयी मुस्लिम मराठी साहित्यिक, लेखकात उत्सुकता होती. परंतु त्यावर लवकरच पडदा पडला. २४ मार्च २०२५ रोजी साहित्य परिषदेच्या केंद्रीय कार्यकारिणीने पुण्यात पत्रकार परिषद घेऊन नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू राहिलेले श. नू. पठाण यांचं नाव संमेलनाध्यक्ष म्हणून घोषित केले. त्यावेळी त्यांची राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं समर्थक असल्याची पार्श्वभूमी दडविण्यात आली. कळताच काहींनी या निवडीवर आक्षेप नोंदवला. परंतु त्याकडे दुर्लक्ष केलं गेलं. विरोधकांना समर्पक उत्तरे दिली गेली नाही. त्यांना टाळण्याची मानसिकता दिसून आली.

साहित्य परिषदेची कार्यकारिणी व सदस्यांना पूर्वसूचना न देता किंवा विचारणा न करता ही निवड घोषित केली गेली. परिणामी परिषदेचे संस्थापक-सदस्य यूसुफ बेन्नूर यांनी तडकाफडकी राजीनामा देऊन टाकला. त्यांनी हा राजीनामा परिषदेचे अध्यक्ष अज़ीज नदाफ व सोलापूर धर्मादाय आयुक्ताकडे टपालाने पाठवला.

संमेलन स्थळी बहुतांश साहित्यिक व मान्यवरांना विद्यमान संमेलनाध्यक्षांची वादग्रस्त पार्श्वभूमी माहीत नव्हती. अध्यक्ष कुठले? त्यांचं साहित्यिक कर्तृत्व काय? अशा प्रकारचे प्रश्न विचारले जात होते. संमेलनात नागपूरचे अनेक आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते व संघटक होते. त्यांच्याकडून संमेलनाध्यक्षांची राष्ट्रीय संघसेवक संघाची जवळीक व त्याच्या हिंदुत्वहितैशी धोरणाबद्दल उपस्थितांना कळत होतं.

शहाबुद्दीन नूरमहंमद पठाण पुण्यातील माईर्स एमआयटीचे सल्लागार असून दोन भागात त्यांची स्वकथने प्रकाशित आहेत. शिवाय वृत्तपत्रातील लेखांची एक-दोन संग्रह प्रसिद्ध झालेली आहेत. गेल्या काही वर्षांपासून संमेलनाचा अध्यक्ष होण्यासाठी त्यांची धडपड सुरू

होती. त्यासाठी त्यांनी आपली ‘सर्वतोपरी तयारी’ची इच्छा अनेकांकडे व्यक्त करून ठेवली होती. त्यासाठी ते मुस्लिमातील विविध सामाजिक संस्थांना स्वत:हून निधी मिळवून देत होते. परंतु प्रत्येक वेळी त्यांची वादग्रस्त पार्श्वभूमी अडचण पुढे आली.

समारोपाच्या भाषणात पठाण यांनी विश्व हिंदू परिषद, आर.एस.एस.च्या नेत्यांची नाव घेऊन उघड कौतुक केलं. त्यांच्या कृत्याचं गौरवीकरण केलं. संघ-भाजपच्या मुस्लिमविरोधी द्वेष मोहिमेचे सामान्यीकरण केलं. संघप्रणित समरसतेचा उदोउदो केला. अशी संघपुरस्कृत व्यक्ती मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष झालेली होती.

फकरुद्दीन बेन्नूर, अजीज नदाफ, विलास सोनवणे यांनी बाबरी उद्ध्वस्तीकरणानंतर सुरू झालेल्या आर. एस. एस., विश्व हिंदू परिषद व तत्सम हिंदूवादी संघटनांनी राबवलेल्या शत्रुकरण तथा मुस्लिमद्वेषी मोहिमेविरोधात ‘मुस्लिम मराठी साहित्य परिषदे’ची स्थापना केली होती. हिंदू राष्ट्रवादी धर्मांध शक्तींच्या मुस्लिमविरोधी दुष्प्रचाराला उत्तर देणे परिषदेचा प्रमुख कार्यक्रम होता. अशा आर. एस. एस.विरोधी संमेलनाच्या अध्यक्षपदी पठाण यांची निवड म्हणजे मुस्लिम मराठी साहित्य चळवळ व तिच्या विचारांशी केलेली प्रतारणा होती.

●

संपादकीय... (पृष्ठ क्र. ६वरून)

अरिष्टाने कम्युनिस्टांमधील किमान या दोन पक्षांना प्राधान्यक्रमही बदलायला भाग पाडले आहे! कम्युनिस्ट पक्षाला आंतरराष्ट्रीय भान असावे; ते असू नये असे नाही; पण देशी भान असूच नये, असेही नाही!

भारतीय कम्युनिस्ट पक्षाने (भाकप) नेहमी आंतरराष्ट्रीय प्रश्नांना अधिक महत्त्व देऊन देशी राजकारणाला सापेक्षत: कमी लेखले. यामध्ये ब्रिटिश साम्राज्यशाही विरोधातल्या भारतीय लढाईचा परमोच्च बिंदू (१९४२) असो, की अगदी अलीकडे अमेरिका भारतातील अणुकरार असो; वेळोवेळी आंतरराष्ट्रीय राजकारणाला झुकते माप देत विशेषत: मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने (माकप) आपली रणनीती आखली. हळूहळू या दोन्ही पक्षांच्या राजकारणाला ओहोटी लागली. २०१९ व २०२४च्या लोकसभा निवडणुकीत माकपला भारतात एकूण मतांच्या अनुक्रमे १.७५ व १.७६ टक्के मते मिळाली; तर भाकपला अनुक्रमे ०.५८ व ०.४९ टक्के मते मिळाली. या दोन पक्षांच्या एकीकरणाचा प्रश्न अजूनही प्रलंबित आहे. आर्थिक शोषण, अस्मितेचे संकुचित राजकारण आणि फॅसिझमच्या दाहात भारतीय जनता होरपळून निघत असताना आणि फुटीवेळच्या मतभेदाचे संदर्भ एव्हाना कालबाह्य झालेले असताना मोठ्या कम्युनिस्ट पक्षांनी स्वतंत्रपणे अस्तित्व ठेवणे आत्मप्रौढीपणाचे आणि आत्मघातकी आहे.

लानिप आणि भाकपा - लिब. यांच्या एकीकरणात सर्वच मुद्द्यांवर लानिप आणि भाकपा - लिब. यांच्यात एकमत असेल असे नाही. तथापि, इतर साम्यवादी पक्षांनी यापासून धडा घेणे आवश्यक आहे. माकप व भाकप खालोखाल भाकपा - लिब. हा तिसऱ्या क्रमांकाचा मोठा पक्ष आहे. आता लानिपविसर्जित भाकपा - लिब., भाकप आणि माकप या तीन पक्षांच्या एकीकरणाचे आव्हान आहे. या सर्व पक्षांची जातिव्यवस्थेविषयीच्या भूमिकेवर एकवाक्यता आवश्यक आहे. या ऐतिहासिक एकीकरणातून व्यापक मुद्दे आणि जनतेचे हित लक्षात घेऊन भारतातील छोट्यामोठ्या पक्ष-संघटनांचे एकीकरण गरजेचे बनलेले आहे. घटनात्मक मार्ग, लोकशाहीवर विश्वास आणि जातिअंत या मुद्द्यांवर राष्ट्रीय चर्चा घडवून आणून हे एकीकरण घडवून येणे आवश्यक आहे. किंबहुना त्याशिवाय हे ऐक्य शक्यही नाही. हे तिन्ही पक्ष ज्या कष्टकरी जनतेच्या मुक्तीला बांधील आहे ती जनता आज होरपळून निघत आहे. या जनतेचा टाहो व्यापक विलीनीकरणाची मागणी करीत आहे!

●

दिलीप चव्हाण
dilipchavan@gmail.com